जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

-: निविदा / दरपत्रक सुचना :-

दिनांक : ११/०६/२०२६

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कागदी कातरन / वेस्ट पेपर रद्दी विकायची आहे. याकरीता ज्या व्यक्ति / संस्था यांना सदरची कागदी कातरन / वेस्ट पेपर रद्दी विकत घ्यायची असेल त्यांनी त्यांची निविदा / दरपत्रक या कार्यालयांस **दिनांक १९/०६/२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत** सादर कराव्यात. त्यानंतर प्राप्त निविदांचा विचार केल्या जाणार नाही.

कागदी कातरन / वेस्ट पेपर रद्दी विक्री करण्याबाबतच्या अटि व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१	जमा असलेल्या ९८ बारदान्यामधील कागदी कातरन/रद्दी अंदाजे ३०० किलो असतील.
२	निविदेमध्ये कातरन/रद्दीचा भाव प्रतिकिलो प्रमाणे नोंदवावा.
३	खरेदी दाराला संपुर्ण मालाची खरेदी किंमत एकमुस्त दयावी लागेल.
४	खरेदी दाराने बारदान्यासह रद्दी खरेदी केल्यास प्रति बारदाना ३० रूपये अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल.
५	ज्या खरेदीदारांस रद्दी खरेदीकरीता निविदा/दरपत्रक सादर करावयाचे आहे त्यांनी अनामत रक्कम १०,०००/- (अक्षरी रूपये दहा हजार फक्त) जिल्हा न्यालयालयामध्ये जमा करावे लागतील. त्याशिवाय निविदा/दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाही.
६	ज्यांची निविदा/दरपत्रक मंजुर/स्विकृत करण्यात येईल त्यांनी रद्दी मोजण्याकरीता वजन काटा/तराजु/धर्मकाटा तसेच माल घेवून जाण्याची व्यवस्था स्वत: करावी लागेल.
७	निविदा/दरपत्रक मंजुर झाल्याचे कळल्यापासून पुढील ३ दिवसाचे आत किंवा दिलेल्या मुदतीमध्ये न्यावा लागेल. तसे न केल्यास रद्दी विक्री करण्याकरीता नव्याने प्रक्रिया राबविण्यात येईल. असे करतांना सरकारचे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्याकरीता संबंधीतांची अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल. व त्यामधून नुकसान रक्कम वसुल करण्यात येईल.
८	सदर रद्दी विक्री करण्याची निविदा/दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता रद्द करण्याचा, विक्री प्रक्रिया स्थगीत करण्याचा किंवा निविदा/दरपत्रक नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना आहे.
९	निविदा/दरपत्रक बंद लिफाफ्यावर रद्दी खरेदीबाबतच्या निविदा/दरपत्रक असे ठळक अक्षरामध्ये नमुद करावे.

स्वा/-
(हेमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

वर्धा
दिनांक : ११/०६/२०२६

पृष्ठांकण क्र. २६५९/रद्दी विक्री निविदा/२०२६.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
दिनांक : ११/०६/२०२६.

प्रतीलीपी माहीतीस व योग्य कार्यवाहीस सादर :

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) सहाय्यक अधिक्षक, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

वर्धा
दिनांक : ११/०६/२०२६

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.